।। ॐ ।।

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

ऑक्टोबर २०२१


२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org


## विनम्र अभिवादन

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

### पुण्यतिथी - २५ ऑक्टोबर



या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ।
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ, संप्रदाय एक दिसू दे ।
मतभेद नसू दे ।।धृ.।।

नांदोत सुखे गरीब, अमीर एकमतानी ।
मग हिंदु असो ख्रिश्चन वा हो इस्लामी ।
स्वातंत्र्य-सुखा या सकलांमाजि वसू दे ।
दे वरचि असा दे ।।१।।

सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना ।
हो सर्व स्थळी मिळुनि समुदाय-प्रार्थना ।
उद्योगी तरुण वीर शीलवान दिसू दे ।
दे वरचि असा दे ।।२।।

हा जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी ।
खळनिंदका-मनीहि सत्य न्याय वसू दे ।
दे वरचि असा दे ।। ३।।

सौंदर्य रमो घराघरांत स्वर्गियापरी ।
ही नष्ट होऊ दे विपत्ति भीति बोहरी ।
तुकड्यास सदासर्वदा सेवेत कसू दे ।
दे वरचि असा दे ।। ४।।

# स्पर्धा परीक्षा केंद्र



**गणेशोत्सव 'श्रमिकांचा बाप्पा' –** स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिका विभाग २०१३ पासून 'श्रमिकांचा बाप्पा' या विचाराने विधायक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करत आहे. सकाळ व संध्याकाळच्या आरतीचा मान परिसरातील खानावळ, रिक्षा, चहा, फुलं, भाजी इत्यादींचा व्यवसाय करणारे तसेच सुरक्षारक्षक, सफाई कामगार म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींना देऊन त्यांच्याशी मोकळ्या गप्पा होतात. यावर्षी श्रींची प्रतिष्ठापना कु. अश्विनी येळे यांच्या हस्ते झाली. ताई सध्या अमरावती जिल्ह्यात तलाठी पदावर कार्यरत आहेत. यातील काही विशेष –



- दि. १२ सप्टेंबरला सायकलपटू श्री. सचिन घोगरे यांच्या हस्ते आरती झाली. ऑगस्ट महिन्यात त्यांनी लेह-लडाख सायकल मोहीम यशस्वीपणे पूर्ण केली. आरतीनंतर या मोहिमेतील व विविध सायकल स्पर्धांमधील अनुभव त्यांनी सांगितले.
- दि. १४ सप्टेंबरला मंगळवार पेठेत फुलांचा व्यवसाय करणारे वर्धिनीचे वर्धक श्री. वैभव जाधव आरतीला आले होते. हा व्यवसाय करत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. M.A. व B.Ped. हा शिक्षणाचा प्रवास त्यांनी सांगितला. विद्यार्थी दशेतच शरीर तंदुरुस्त राखा, सलग १०-१२ तास अभ्यास करताना दिवसातला किमान १ तास व्यायामासाठी राखून ठेवा असा आग्रह त्यांनी मनोगतातून व्यक्त केला.



- दि. १६ सप्टेंबरला वर्धिनीजवळ 'अंबिका अमृततुल्य' चहाचा व्यवसाय करणाऱ्या श्री. अजित दवे यांच्या हस्ते आरती झाली. दुकानाची जबाबदारी असल्याने त्यांच्या शिक्षणात खंड पडला. पण शिक्षणाच्या ओढीने त्यांनी १४ वर्षांनंतरही L.L.B. ला प्रवेश घेऊन शिक्षण पूर्ण केले. सध्या ते वकिलीचा व्यवसाय करत आहेत.



**✲ 'असेल जिद्द तर' –** दि. १८ सप्टेंबरला संगणक अभियंता राधेय लक्ष्मण पिल्ले यांची तुषार नांगुर्डे यांनी मुलाखत घेतली. जीवनाचा संघर्षमय प्रवास सांगताना राधेय म्हणाला, "वयाच्या तिसऱ्या वर्षी विजेच्या झटक्याने दोन्ही हात गमावले. लहान वयात आई वडिलांच्या अपघाती निधनाने मी अनाथ झालो आणि कायमचे अपंगत्व आले. अनाथाश्रमात वाढलो. परिस्थितीपुढे हार न मानता पायांनी लिहायला सुरुवात केली. स्वतःची कामे स्वतः करायला शिकलो. दहावीनंतर ११ वी, १२ वीचे शिक्षण नोकरी करून पूर्ण केले. त्यानंतर बी. टेक. झाल्यानंतर संगणक अभियंता म्हणून काम करत आहे. दिव्यांग म्हणून आम्हाला समाजाकडून प्रोत्साहनाची जास्त अपेक्षा आहे."





## ❋ अभिनंदन ❋

- केंद्राचे माजी विद्यार्थी मल्लिनाथ कांबळे, अधिक्षक, शासकीय पुरुष भिक्षेकरी स्वीकार केंद्र, नागपूर यांची जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर 'वर्ग अ' पदासाठी पदोन्नती झाली.
- MPSC 2019 च्या सुधारित निकालानुसार आपले विद्यार्थी गणेश मंडलिक (उपशिक्षण अधिकारी गट ब) यांची गटविकास अधिकारी गट 'अ' पदासाठी आणि प्राची कर्णे (तहसीलदार) हिची DYSP/ACP गट अ पदासाठी निवड झाली आहे.
- UPSC 2020 मधून किरण चव्हाण, विकास पालवे आणि रामकृष्ण शाखेचा वर्धक पार्थ कश्यप यांची निवड झाली आहे.
- केंद्राचे माजी विद्यार्थी घनश्याम बल्लाळ (पोलीस निरीक्षक) विलेपार्ले पोलीस स्टेशन, मुंबई यांचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल सहा. पोलिस आयुक्त झोन-८ यांच्यातर्फे सन्मान करण्यात आला.
- गणेश शेलार (सहाय्यक लोकोपायलट, मध्य रेल्वे) यांचा चांगल्या कामगिरीबद्दल जनरल मॅनेजर, मध्य रेल्वे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला.
- सुभाष बोराटे यांची राज्य कर सहाय्यक पदासाठी (OBC प्रवर्गातून प्रथम) निवड झाली आहे.

**सर्वांचे वर्धिनी परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन.**

## गणेशोत्सव ई व्याख्यानमाला २०२१

'स्व'-रूपवर्धिनी संस्था गेली चार दशके पुण्यातील गणेशोत्सवामध्ये हिरीरीने सहभागी होते आहे. ढोल-ताशा पथक, पथनाट्ये, ध्वजपथक इत्यादी माध्यमातून पुण्यातील अनेक नामांकित गणेश मंडळांसमोर आपली सेवा वर्धिनीने रुजू केली आहे. यंदाच्या वर्षी कोविड - १९ महामारीच्या पार्श्वभूमीवर गणेशोत्सव साध्या पद्धतीने साजरा करावा असा सरकारचा आदेश आला म्हणून यंदाच्या गणेशोत्सवात वर्धिनीने समाज प्रबोधनासाठी दूरदृश्य प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई-व्याख्यानमालेचे आयोजन केले होते.

या व्याख्यानमालेचा मुख्य विषय **'पर्यावरण प्रथम'** असा होता.

यंदा सर्वांना एकत्र येण्यावर प्रबंध असल्यामुळे या व्याख्यानमालेत 'यूट्यूब लाईव्ह' माध्यमातून ३ सत्रे घेतली. या व्याख्यानमालेचा मुख्य उद्देश युवकांचे प्रबोधन करणे हा होता. ही व्याख्याने दूरदृश्य प्रणालीद्वारे (ऑनलाईन) 'स्व'-रूपवर्धिनीच्या यूट्यूब चॅनेलवर सर्वांना उपलब्ध करून दिली आहेत. ज्यांना ही व्याख्याने ऐकण्याची इच्छा आहे त्यांनी यूट्यूबवर त्याचा लाभ घ्यावा आणि आपल्या प्रतिक्रिया जरुर कळवाव्यात.

- **पहिले पुष्प -**

बुधवार १५ सप्टेंबर २०२१,

- **विषय - हरित घर**
- **प्रमुख वक्ते - सौ. स्नेहलताई गोखले,** पर्यावरण गतविधी समन्वयक (निसर्गप्रेमी, पर्यावरण प्रेमी).

स्नेहल ताईंनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी एक वेगळीच संकल्पना आमच्यासमोर मांडली. ती म्हणजे - हरित घर. तसेच आपल्या अवतीभोवती असणाऱ्या वृक्षांची विविधता समजून घेण्यासाठी त्याचा अभ्यास कोणत्या प्रकारे करायचा हे त्यांनी सांगितले. मग ते झाडांच्या खोडाचा अभ्यास असो वा प्रत्येक झाडाच्या पानांचे निरीक्षण, सर्व खूपच शिकण्यासारखे होते. पर्यावरण वाचवणे म्हणजे फक्त झाडांची होणारी हानी रोखणे नाही तर पर्यावरणाचा भाग असणाऱ्या पशुपक्ष्यांची सुद्धा काळजी घेतली पाहिजे हे त्यांच्या मार्गदर्शनातून समजले. तसेच त्यांचे जीवन समजून घेण्यासाठी त्यांचा अभ्यास करावा लागतो आणि तो अभ्यास कोणत्या वेगवेगळ्या कृतींमधून करता येऊ शकतो हे समजले. स्नेहल ताईंनी असे सांगितले

की आपण जे दोरे, कापसाची वस्त्रे फेकून देतो तेच आपण खिडकीत किंवा जिथे पक्ष्यांची ये-जा होत असते अशा जागी ठेवले तर ते पक्षी आपण ठेवलेले दोरे घेऊन जातात. असंच रोज जर आपण त्यांच्यासाठी केलं तर पक्ष्यांना मदत होते. तसेच दोरा न्यायला आलेल्या पक्ष्यांचे निरीक्षण किंवा अभ्याससुद्धा करता येऊ शकतो. स्नेहल ताईंनी 'हरित घर' ही संकल्पना इतक्या रोचक शब्दांत मांडली की पर्यावरणाबद्दल जाणून घेण्याची एक उमंग तयार झाली. या गणेश व्याख्यानमालेच्या निमित्ताने सर्वांना पर्यावरणाबाबत एका वेगळ्याच विषयाची ओळख झाली.

ताईंचे मार्गदर्शन झाल्यावर प्रश्न सत्र सुरू झाले. युवकांनी पर्यावरणाबाबत पडलेल्या अनेक प्रश्नांना ताईंनी सोप्या भाषेत उत्तरे दिली. युवकांमध्ये नंतर एक छोटे चर्चासत्र झाले, ज्यामध्ये व्याख्यानात नमूद असलेल्या काही मुद्द्यांवर विशेष चर्चा झाली.

- **दुसरे पुष्प -**

दि. १७ सप्टेंबर रोजी लोकसहभागातून **'नदी पुनरुज्जीवन'** या विषयावर आधारित 'जीवितनदी लिव्हिंग रिव्हर फाउंडेशन' या संस्थेच्या संचालिका **मा. शैलजाताई देशपांडे** यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. शैलेजाताईंनी व्याख्यानमालेत नदी या विषयावर खूप नवीन माहिती सांगितली. शहरातील नद्या व गावातील नद्या यामधील फरक उलगडून दाखवला. आपल्यापर्यंत पाणी कसे येते, आपलं सांडपाणी कुठे जाते. नद्या त्यांना जोडणाऱ्या अनेक उपनद्या आहेत. आपण जसे जिवंत आहोत तसेच नद्या पण जिवंत असतात. हिमालयातील नद्या व सह्याद्रीतून वाहणाऱ्या नद्या यामधील फरक त्यांनी कथन केला. हिमालयातील नद्यांना बर्फ वितळल्यावर पुन्हा पाणी मिळते. म्हणून त्यांना बारमाही पाणी उपलब्ध होते. आजूबाजूला हिरवळ असते. आपल्याकडील नद्यांना जेवढा पाऊस पडेल म्हणजेच २ किंवा ३ महिने तेवढंच पाणी मिळते. नदीला प्रवाह असलाच पाहिजे. नदी ही जिवंत परीसंस्था आहे. महाराष्ट्र एक प्रगत राज्य असूनही सर्वात प्रदूषित नद्या महाराष्ट्रात आहेत. याला जबाबदार आपण आहोत. आपण आपल्या घरात खूप साऱ्या वस्तूंचा उपयोग करतो जसं की टूथपेस्ट किंवा आंघोळीचा साबण या गोष्टींमधून पाणी दूषित होते. माहितीपूर्ण व्याख्यानानंतर सर्वांनी एक संकल्प केला की नदी प्रदूषित होणार नाही याची काळजी आम्ही घेऊ.

- **तिसरे पुष्प -**

दि. १८ सप्टेंबर,

- **वक्ते : श्री. सारंग यादवडकर सर**
- **विषय : पर्यावरणावर होणारे अतिक्रमण आणि शाश्वत विकास यांचा समतोल कसा राखावा ?**

तिसऱ्या पुष्पाचे वक्ते पर्यावरणप्रेमी सारंग यादवाडकर सर होते. त्यांनी शाश्वत विकास म्हणजे काय हे समजून सांगितले. शाश्वत विकासाची व्याख्या आणि शाश्वत विकास कसा करावा हे देखील सांगितले. त्यानंतर सरांनी शाश्वत विकासाच्या नावावर मानवाने निसर्गावर केलेले अत्याचार व नैसर्गिक हानी याबद्दल सांगितले. पर्यावरणावर होणाऱ्या अतिक्रमण या विषयावर अनेक कायदेशीर लढे दिले, त्याचे अनुभव सांगितले. पर्यावरण विकासाची सुरुवात आपल्या युवकांनी कशी करावी, भ्रष्टाचार विरोधात जाऊन पर्यावरणवादी विचार करून पर्यावरण कसे चांगले राखता येईल हे सांगितले. विकासाचा वेग कसा असावा, त्याची दिशा योग्य कशी असावी, युवकांनी पर्यावरण विषयाचे कायदे जाणून घेऊन पर्यावरणावर होणारे अतिक्रमण, शाश्वत विकास यांचा समतोल राखून देशोन्नतीसाठी कोणते मार्ग तयार होतील याचे त्यांनी मार्गदर्शन केले.







# शाखा विभाग

- **गणेशोत्सव** - वर्धिनीच्या सांस्कृतिक विभागातर्फे दरवर्षी पुण्याच्या विविध भागात पथनाट्याद्वारे समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जातात. शाखांमध्ये येणारे बालचमू त्यांच्या अभिनयाची चुणूक दाखवत भारदस्त आवाजात गणेशोत्सवाच्या १० दिवसांच्या कालावधीत अनेक ठिकाणी पथनाट्य सादर करतात. यावेळी प्रत्यक्ष मैदानावर उतरणं शक्य नव्हतं तरीही वर्धिनीची ही परंपरा अखंड ठेवत अनेक शाखांनी सामजिक जागरूकतेचे हे काम पथनाट्य व्हिडिओ, लघुपट या माध्यमातून दूरदृश्य प्रणाली (ऑनलाईन) पद्धतीने सर्वांपर्यंत पोहोचवले. यामुळे चित्रीकरण, संपादन, ध्वनीमुद्रण अशा तंत्रांची ओळख मुलांना झाली.




रविवार दि. ५ सप्टेंबर २०२१ वेळ सकाळी १०.३० ते १.३० या वेळेत **'माझी वर्धिनी माझा गणेशा'** या उपक्रमामध्ये गणेश मुर्ती रंगवणे स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमात एकूण ३५ मुलं-मुली सहभागी होते. गणेश मूर्तींना कशा प्रकारे रंग द्यायचा ? रंग देताना काय काळजी घ्यावी ? रंगकाम करताना साहित्य कोणते व कसे वापरावे ? याची माहिती धनंजय नवगिरे दादाने दिली. या कार्यक्रमाला बालभारतीच्या पुस्तकासाठी चित्रकार म्हणून काम बघणाऱ्या धनश्रीताई केळकर परीक्षण करण्यासाठी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाची संकल्पना श्री. चैतन्य कुसुरकर यांची होती. कार्यक्रमाला लागणारी मदत करणारे सत्यम तांबडे, सायली गुरव, हर्षल सोनार हे उपस्थित होते. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले.

- **भगिनी निवेदिता शाखा** - सप्टेंबर महिन्यामध्ये विविध कौशल्यावर भर देणारे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्या दृष्टिकोनातून शाखेत पथनाट्य कार्यशाळा, नेतृत्व विकास कार्यशाळा व श्रवण कौशल्य कार्यशाळा घेण्यात आल्या.

- पथनाट्य कार्यशाळा तन्मय जक्का दादाने घेतली. अभिनय कसा करावा, पथनाट्यासाठी विषय कोणते असावे, त्याचे लेखन कसे करावे याबद्दल दादाने मार्गदर्शन केले.

याचा उपयोग गणेशोत्सवात पथनाट्य सादरीकरणासाठी झाला. वर्धिकांनी गणेशोत्सवात **'कोरोना आणि मी'** हे पथनाट्य सादर केले.

वर्धिनीतील स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांसमोरही याचे सादरीकरण झाले. यावेळी या कार्यक्रमाला डिजिटल प्रसिद्धीची जोड देण्यात आली. हे पथनाट्य 'यु ट्यूब' या प्रसारमाध्यमावरील 'स्व'-रूपवर्धिनी या चॅनलवर प्रसारित करण्यात आले.

- नेतृत्व कौशल्य अंतर्गत शाखेतील ९ वीच्या वर्धिकांनी नियोजन करून शाखेची शाखाप्रमुख समृद्धी यादव ताईची मुलाखत घेतली. यातून सूत्रसंचालन कसे करावे, कार्यक्रमाची रूपरेषा कशी असावी, त्यासाठी विविध जबाबदारीचे वाटप कसे करावे याचा अनुभव वर्धिकांनी घेतला.

- श्रवण-स्मरण कौशल्य कार्यशाळा कोमल धायरकर ताई यांनी घेतली. ज्ञान ग्रहणासाठी श्रवण ही एक पायरी आहे हे वर्धिकांना पटवून देताना ताईंनी विविध कृतीपर खेळातून कार्यशाळा घेतली. जो उत्तम ऐकू शकतो तोच उत्तम बोलू आणि लिहू शकतो हा मंत्र ताईंनी सांगितला.

'अवम' तर्फे आयोजित प्रदर्शनाला शाखेतील वर्धक युवतींनी भेट दिली. यावेळी मुलीही उत्तम व्यवसायिक होऊ शकतात ही भावना त्यांच्या मनात रुजवली गेली.

- **स्वामी सुबोधानंद शाखा** - सप्टेंबर महिन्यामध्ये सर्व शासकीय नियम पाळून शाखा घेण्यात आली. सर्व व्यवस्थांचे नियोजन करून त्यानुसार मैदान, तासिका, कार्यक्रम व संपर्क घेण्यात आले.

गणेशोत्सवानिमित्ताने सर्व वर्धकांच्या घरी संपर्क करण्यात आला. यामुळे गणेश मूर्ती संकलनात वर्धकांचा सहभाग वाढलाच, तसेच काही पालकांनीही या उपक्रमात आपला सहभाग दाखविला.

शाखेत चित्रकला स्पर्धा, पाककला स्पर्धा, सजावट स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांचे विषय हे वर्तमान परिस्थितीशी निगडित होते. यामध्ये पुढील वर्धकांना पारितोषिके मिळाली.

- चित्रकला स्पर्धा विजेते – १) साईराज पंडित – ५ वी, २) यश गाडेकर – ८ वी
- पाककला स्पर्धा विजेते – १) गौरव जावळे – ८ वी, २) आर्यन तनपुरे – ७ वी, ३) तन्मय मारणे – ८ वी
- सजावट स्पर्धा विजेते – १) अथर्व लोहारे – ८ वी, २) ओम गायकवाड – ९ वी, ३) श्रेयस वाघ – ८ वी
- निबंध स्पर्धा विजेते – १) सिद्धार्थ मेणे – ७ वी, २) संकेत बाईल – १० वी, ३) गौरव जावळे – ८ वी

५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त शाखेत व्याख्यान झाले. यावेळी शाहू शाखेतील श्री. सार्थक फाले या युवकाने 'शिक्षक दिन का साजरा केला जातो' याचे मार्गदर्शन केले.

- **स्वामी श्रद्धानंद शाखा** – गणेशोत्सवात शाखेतील सर्व युवकांनी व वर्धकांनी मिळून **'कोविड एक शाप'** हा लघुपट बनवला. यातून कमी



वेळात उत्तम आशय व प्रसंग मांडणी कशी करावी हे शिकायला मिळाले. पालकांकडून या लघुपटाला उत्तम प्रतिसाद मिळाला. 'अक्षर गणेश' ही स्पर्धा झाली. मुलांना प्रथम नावातून गणपती काढण्याचे प्रशिक्षण दिले व



नंतर ही स्पर्धा झाली. गणपतीच्या दहा दिवसात गटशः मुलांच्या व शिक्षकांच्या घरी आरतीला जाऊन उत्तम संपर्क झाला. शाखेच्या परिसरात



सहा-सात ठिकाणी लसीकरण मोहीम घेण्यात आली. शाखेच्या युवकांनी नाव नोंदणी व पुढील पुर्नतपासणी कामात सहभाग घेतला.

- **स्वामी दयानंद सरस्वती शाखा** – गणेशोत्सवात दि. १८ सप्टेंबरला रक्तदान शिबिरात ४६ पिशव्यांचे संकलन झाले. दि. २६ सप्टें. प्रियदर्शिनी शिक्षण संस्था शाळेत 'कोरोना लसीकरण' मोहीम झाली. ६२४ जणांनी याचा लाभ घेतला.

## ❋ व्यावसायिक नवदुर्गा ❋

नवरात्रौत्सवाच्या निमित्ताने AWAM प्रस्तुत ओळख व्यावसायिकांची या उपक्रमांतर्गत वर्धिनीच्या युवती कार्यकर्त्यांच्या व्यावसायिक प्रवासाची ओळख करून देण्यात आली. पोस्टर्सच्या माध्यमातून नवरात्रीतील नऊ दिवस विविध व्यवसाय करणाऱ्या नऊ युवतींची आणि त्यांच्या व्यवसायांची ओळख करून देण्यात आली.

- **सुरेखा माळी**
  सुरुची फुडस्
- **सुवर्णा सुगंधी (सनगरे)**
  चॉकलेट बनवणे
- **स्नेहा पाझारे (जोरकर)**
  श्री स्नेह आर्ट कलेक्शन
- **मधुमिता निलाखे**
  Madumitas Kitchen
- **हर्षदा शिंदे**
  Nrutyarsh Kathak Dance Insti.
- **श्वेता वडके**
  स्वरा नील फुडस्
- **गीतांजली बेलोसे**
  Grishma Garden Care
- **रेणुका दड्डीकर**
  शिव कलेक्शन
- **प्रतिमा फुले (वाघमारे)**
  द एलिगन्स ब्यूटी सलून ॲण्ड स्पा

## ✻ मैत्र जीवांचे ✻




दिनांक २१ ऑगस्टला 'मैत्र जीवांचे' हा लघुपट प्रदर्शित झाला. वर्धन कृतीपुस्तिकेतील विषयांवर आधारित हा लघुपट होता. मैत्री निसर्गाशी, कुटुंबाशी, समाजाशी, स्वतःशी कशी असावी? हे या लघुपटातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या लघुपटाचे लेखन, दिग्दर्शन इ. वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी केले आहे. कलाकार ही वर्धिनीचे वर्धक आहेत. विविध प्रकारच्या कामाचा अनुभव सर्वांना मिळाला. सलग ३ दिवस चित्रीकरणाचे नियोजन करून दिवसा आणि रात्री अशा दोन्ही वेळी हे काम झाले. 'देते कोण?' हे गाणे या लघुपटासाठी मुलांनी त्यांच्या आवाजात ध्वनीमुद्रित केले. डबिंग करण्याचा अनुभव मुलांना मिळाला. संपादन, साऊंड, DI ची प्रक्रिया कशी करतात हे बघायला मिळाले. लघुपटाच्या विमोचनाचा कार्यक्रम २१ ऑगस्टला झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध अभिनेते व गायक **श्री. अजय पुरकर** उपस्थित होते. ते म्हणाले, 'कोणतीही कला साधनेशिवाय फुलत नाही. अशी साधना करणारे सद्विचारी लोक एकत्र येऊनच चांगले काम उभे राहते. वर्धिनीच्या वास्तूत ही प्रचिती मी अनुभवली. लघुपटाचा हा पहिलाच प्रयत्न असूनही मुलांची अभिनयातील सहजता आणि कौशल्य उत्तम असल्याचे जाणवले. यापुढेही असे प्रयोग वर्धिनीत होत रहावेत यासाठी शुभेच्छा.' शेवटी 'सर्वात्मका सर्वेश्वरा' हे गीत त्यांनी सादर केले. या लघुपटासाठी दिग्दर्शक **श्री. दिग्पाल लांजेकर** यांनी मोलाचे सहकार्य केले. लघुपटाला लागणारे तांत्रिक सहाय्य त्यांनी केले. मयुरेश बवरे, सौरभ ससाणे, तन्मय जक्का यांनी लघुपटाची तांत्रिक बाजू सांभाळून लघुपट उत्तम करण्यासाठी मदत केली.

---

श्री तुळशीबाग गणपती मंडळ ट्रस्ट प्रस्तुत शिल्पकारांचा गणपती या ऑनलाईन मालिकेतून मंडळात आजवर गाजलेल्या देखाव्यांची, सजावटाची माहिती तुळशीबाग महागणपतीच्या यू ट्यूब चॅनेलवर देण्यात आली. यातील एका भागात तुळशीबाग मंडळ आणि 'स्व'-रूपवर्धिनी यांच्या ३५-४० वर्षाच्या ऋणानुबंधाविषयी मुलाखतीद्वारे माहिती देण्यात आली. प्रसिद्ध मुलाखतकार मिलिंद कुलकर्णी यांनी वर्धिनीचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी आणि श्री. अजय कदम यांच्या प्रकट मुलाखतीतून गणेशोत्सवाची ही परंपरा मांडली.

# युवा विभाग

**AWAM (आपली वर्धिनी आपली माणसं)** गट प्रस्तुत वर्धिनीच्या व्यावसायिकांचे पहिले विक्री प्रदर्शन दि. ४ सप्टेंबरला वर्धिनीच्या वास्तूत उत्साहात झाले. या प्रदर्शनात युवक, युवती व महिला गटाचे एकूण १४ स्टॉल होते. यात ज्वेलरी, पर्स, बांगड्या, मास्क, गणपती सजावट साहित्य, आर्ट क्राफ्ट, विमा समुपदेशन, घरगुती पीठे, नानाविध खाद्यपदार्थ यांचा समावेश होता. सकाळी १० वाजता सुरू झालेले प्रदर्शन संध्याकाळी ६ वाजेपर्यंत चालू होते. येणाऱ्या प्रत्येक ग्राहकागणिक प्रदर्शनाचे वातावरण उत्साहित होत होते. बऱ्याच युवक युवतींच्या आणि ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या सदिच्छा भेटी स्टॉल धारकांचा उत्साह वृद्धिंगत करत होत्या. एकंदर दिवसभराचे हे प्रदर्शन छान झाले आणि मिळालेला प्रतिसाद देखील चांगला होता. AWAM चा हा पहिलाच प्रयत्न होता. या प्रदर्शनासाठी कार्यकर्ता गट आणि आपल्या परिवारातील सदस्यांकडून मिळालेला आशादायी प्रतिसाद, AWAM च्या पुढच्या वाटचालीसाठी नक्कीच प्रेरणादायक ठरेल आणि त्याचा लाभ हा वर्धिनीच्या व्यावसायिकांना होईल यासाठी हा गट सतत प्रयत्नशील राहील.

- **बारावी एकत्रीकरण -**

बारावी उत्तीर्ण झालेल्या (२०२१ मध्ये) सर्व नवयुवकांचे दि. २५ व २६ सप्टेंबरला वर्धिनीत एकत्रीकरण करण्यात आले. दि. २५ ला सायंकाळी ७ वाजता शाखा भरवण्यात आली. उपस्थित प्रत्येक युवकाने सर्वांचा तीन मिनिटांचा खेळ घेण्याचा उपक्रम झाला. यातून सर्वांचा परिचय झाला. त्यानंतर लिंग समानता (gender equality), सामाजिक भान या विषयावर आधारित काही लघुपट दाखवण्यात आले आणि त्यावर चर्चासत्र झाले. यात २० युवक सहभागी झाले. दि. २६ ला उपासना, मानसिक विकास बैठक होऊन एकत्रीकरणाची सांगता झाली.

- **गणेशमूर्ती संकलन -**

गतवर्षीप्रमाणे याही वर्षी अनंत चतुर्दशीला महानगरपालिकेच्या 'मूर्ती संकलन अभियाना'त वर्धिनीच्या ११५ युवा कार्यकर्त्यांनी मदत केली. एकूण २१ संकलन केंद्रांवर झालेल्या या मोहिमेत युवा विभागासोबतच उत्थान विभागातील कार्यकर्त्यांनीही ही मोहीम यशस्वी करण्यात योगदान दिले.




## ❊ वज्रनिर्धार लसीकरण महाअभियान २०२१ ❊

बाळासाहेब देवरस पॉलिक्लिनिक, सीरम इन्स्टिट्यूट, पीसीसीआर, 'स्व'-रूपवर्धिनी, निरामय व सह्याद्री हॉस्पिटल यांच्या विद्यमाने आयोजित २५ ऑगस्टपासून सुरू झालेल्या मोफत लसीकरण अभियानात आतापर्यंत ४६ शिबिरे झाली आणि १५,५६३ लोकांनी याचा लाभ घेतला आहे. या कामात वर्धिनीचे युवक-युवती, बालवाडी शिक्षिका व कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

# समुपदेशन विभाग

▪ **संयम प्रकल्प -**

दि. २८-३० सप्टेंबर या कालावधीत चंद्रकांत दरोडे विद्यालय या शाळेत तीन दिवसांची ७ वी ते ९ वीच्या मुलींसाठी मा. पुष्पाताई कोळपे यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा घेण्यात आली. 'पंचकोश', 'सौंदर्य' हे विषय कु. ऋतुजा नराल ताईने व 'प्रसारमाध्यमे' हा विषय सौ. सोनल जुवेकर ताईने मांडला. प्रसारमाध्यमांमध्ये संगणकाचा उपयोग कसा होतो हे कळण्यासाठी बाहुबली चित्रपटात विशेष परिणाम करणारे प्रसंग दाखवले. यातून जाहिरातींना फसू नये, आकर्षित होऊ नये हे मुलांच्या लक्षात आले.

▪ **पालक कट्टा -**

मा. साधनाताई सेठिया - दि. २३ सप्टेंबर

ताईंनी प्रथम मुलांना समजून घेतानाचे प्रश्न पालकांकडून जाणून घेऊन मार्गदर्शनाला सुरुवात केली. त्या म्हणाल्या, 'मुलांशी सतत संवाद होणे अत्यावश्यक आणि महत्त्वाचे आहे. या संवादातून त्यांना प्रोत्साहन मिळाले पाहिजे. यामुळे त्यांनी ठरवलेल्या ध्येयापर्यंत ती पोचू शकतील. मुलांना गरज असेल तेव्हा तुम्ही वेळ द्या. शिक्षा आणि बक्षीस योग्य वेळी द्यायला पाहिजे.'

▪ **विशेष सत्र कार्यकर्त्यांसाठी -**

मा. अरविंद केळकर - दि. २२ सप्टेंबर.

'मी कोण आहे?' हा विषय मांडताना सर म्हणाले, 'प्रत्येकाने स्वत:साठी वेळ दिला पाहिजे. आपल्यातल्या आनंद देणाऱ्या गोष्टी शोधा. यातून मिळणारा आनंद पैशात कधीच मोजता येणार नाही. स्वत:कडे असलेल्या गुणांचा उपयोग कसा करता येईल याचा सतत विचार केला पाहिजे. कोणतीही नवीन गोष्ट शिकण्यासाठी वय आडवे येत नाही त्यामुळे शिकण्याची धडपड सोडू नका.'








## पाकोळी बालवाडी

**शिक्षक दिन** – दूरदृश्य (ऑनलाईन) माध्यमात ५ सप्टेंबरला शिक्षक दिन साजरा झाला. मोठ्या गटातील श्रीनिवासने १ ते १० अंकांचा राशी परिचय हा पाठ घेतला. इतर मुलांनी बडबड गीते, अभिनय गीते सादर केली. ताईंनी सर्व मुलांचे कौतुक केले आणि एक गोष्ट सांगितली.

गणेशोत्सवात मुलांच्या गटावर गणपतीच्या गोष्टी व गाणी शिक्षकांनी पाठवल्या. मुलांनी घरातल्या गणपतीसमोर या गाण्यांचे सादरीकरणाचे व्हिडिओ शिक्षक गटावर पाठवले. मुलांसाठी कडधान्यांचा परिचय, इंग्रजी व मराठी अक्षरांची ओळख, प्राण्यांचा परिचय, भौमितिक आकारांची ओळख, फळांचा परिचय या पाठांचे व्हिडिओ पाठवले गेले.

पानांपासून गणपती तयार करणे व भौमितिक आकारातून विदूषक तयार करणे या गोष्टीत मुलं रममाण झाली होती. शिक्षिकांनी काही मुलांच्या घरी जाऊन गौरी गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी आम्ही पण उद्यापासून शाळेत येणार असा हट्ट मुलांनी बोलून दाखवला.







## श्रद्धांजली

- वर्धिनीच्या कार्यकर्त्या सौ. रेखाताई मुसळे यांचे सासरे श्री. गुरुनाथ केशव मुसळे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

- ज्येष्ठ साहित्यिक, लेखक श्री. दत्तात्रय मा. मिरासदार यांचे ९४ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.

  त्यांचे वर्धिनीच्या शिबिरांमध्ये 'कथाकथन' या विषयावर मार्गदर्शन मिळत असे.

- स्वामी श्रद्धानंद शाखेचा युवक हर्षवर्धन गायकवाड यांच्या आई श्रीमती संगीता गायकवाड यांचे निधन झाले.

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.**



# दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

नव स्फूर्तीचा नव्या मनूचा
दीप चेतवू नव–ज्ञानाचा
त्या दीपाच्या दिव्य प्रभेने
राष्ट्र आमुचे उजळुन डुलवू,
उंच ध्वजा अंबरी ।।

